महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

सोमावार ■ २७ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १२१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी



## शिरवलीच्या सरपंच सारिका आगिवले ग्रामरत्न पुरस्काराने सन्मानीत!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील शिरवली (मा) ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच सारिका बारकु आगिवले यांना आखिल भारतिय सरपंच परिषद यांच्या कडून ठाणे जिल्ह्यातून ग्रामरत्न पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. सरपंच सारिका आगिवले या उच्च शिक्षित असून मुरबाड तालुक्यातील त्या एकमेव सर्वात कमी वयाने सरपंच पदावर विराजमान झाल्या आहेत.आपल्या शिक्षणाचा उपयोग गावातील नागरिकांसाठी, तसेच गोरगरीब, आदिवासी बांधव्ाांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्या सतत प्रयन्तशिल असतात.तसेच त्यांनी शिरवली ग्रुप ग्रामपंचायत मध्ये विविध विकासात्मक कामे केली असल्याने त्यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.एक तरूणी गावचा विकास करू शकते असे आदर्शव्रत काम तिने करून दाखविले आहे. या पुरस्कारा बद्दल बोलताना याचे श्रेय माझे आई वडील, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा भाऊ अक्षय आगिवले व ग्रासस्थांना जात असल्याचे स्ांगून सर्वांचे त्यांनी आभार मानले आहेत.त्यांना हा पुरस्कारा मिळाल्या बद्दल मुरबाड तालुक्यासह संपूर्ण ठाणे जिल्हात त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी किसनराव तारमले



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** ठाणे जिल्हा ग्रामीण राष्टवादी काँग्रेस (अजित दादा गट) अध्यक्षपदी किसन तारमले यांची निवड एकमुखाने करण्यात आली. राष्टवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांनी जिल्ह्यातील सर्व प्रदेश सदस्यासह तालुका, जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार एकमुखाने ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्षपदी किसनराव तारमले यांची नियुक्ती केली. दिनांक 25 ऑटोम्बररोजी जिल्हा अध्यक्ष भरत गोधळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या या पदावर पक्ष संघटनेची जबाबदारी सुपूर्द करण्यासाठी प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, यांनी कल्याण येथे जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन किसनराव तारमले यांच्याकडे जिल्हा अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली त्याला सर्व कार्यकर्त्यांनी एक मुखाने पाठिंबा दिला. श्री तारमले यांचे सर्व थरातून अभिनंदन होतं आहे.

## ५२ अनधिकृत इमारतींना ठाणे मनपाच्या नोटिसा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**ठाणे :** संपूर्ण कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील तब्बल 52 अनधिकृत इमारतींमधील नागरिकांना इमारती खाली करण्याच्या नोटिसा ठाणे महापालिकेच्या वतीने पाठवण्यात आल्या आहेत. तत्कालीन सहाय्यक आयुक्त प्रणाली घोंगे यांनी 2021 साली कळवा प्रभाग समितीमध्ये 52 इमारती अनधिकृत असल्याचा महत्वपूर्ण अहवाल परिमंडळ उपायुक्तांना दिला होता. मात्र या इमारतींवर कोणत्याच प्रकारची कारवाई करण्यात आली नव्हती. काही दिवसांपूर्वीच न्यायालयाने उपस्थित केलेल्या प्रश्नांमध्ये तत्कालीन सहाय्यक आयुक्त घोंगे यांच्या अहवालावरून पालिका लेखी विचारणा केल्यानंतर आता पालिकेने नोटीस देण्याची कारवाई केली आहे.

मुंब्रा दिवा आणि शीळ भागातील अनधिकृत बांधकामाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने ठाण्याचे मुख्य न्यायमूर्ती यांना चौकशी करण्यासाठी जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश जी. जी. भन्साली यांची चौकशी न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली होती. न्यायमूर्ती भन्साली यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि समाजसेवक यांची साक्ष घेतली होती.

# देशाचे आगामी सरन्यायाधीश कोण ?

## विद्यमान सरन्यायाधीश बीआर गवई आज करणार घोषणा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता





**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान सरन्यायाधीश बी. आर. गवई येत्या २३ नोव्हेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. त्यांच्यानंतर नवे सरन्यायाधीश कोण होणार, याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. नव्या सरन्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी सरकारी पातळीवर प्रयत्नदेखील सुरू झाले आहेत. अशातच आता नव्या सरन्यायाधीशांचे नाव समोर आले आहे. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी स्वतः नव्या सरन्यायाधीशांच्या नावाची घोषणा केली आहे. कायद्यानुसार, सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीशांची सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती केली जाते. त्यानुसार जस्टीस सूर्यकांत सध्या सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाची शिफारस विद्यमान सरन्यायाधीशांकडून करण्यात आली आहे. आज म्हणजेच सोमवारी अधिकृतपणे त्यांच्या नावाची शिफारस केंद्र सरकारकडे केली जाणार असल्याचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी सांगितले. मी रविवारी संध्याकाळी दिल्लीत पोहोचणार आहे. त्यानंतर सोमवारी जस्टीस सूर्यकांत यांच्या नावाची अधिकृत शिफारस केली जाईल, असे ते म्हणाले.


जस्टीस सूर्यकांत हे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यानंतर सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. ते मूळचे हरियाणाचे असून त्यांचा जन्म एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. त्यांनी यापूर्वी हरियाणाचे महाधिवक्ता म्हणूनही काम केले आहे. याशिवाय ते राष्ट्रीय विधिक सेवा प्राधिकरणाचे विद्यमान अध्यक्ष आहेत. त्यांनी १९८४ मध्ये रोहतकमधून कायद्याची पदवी प्राप्त केली आहे. ते हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशही राहिले आहेत. आता २४ नोव्हेंबर २०२५ रोजी ते सरन्यायाधीश पदाची शपथ घेणार आहेत, असे सूत्रांमार्फत समजते.

# सुभाष पवार, तारे मामा लवकरच भाजपात ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी





**कल्याण :** महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकाचे पडघम वाजू लागताच ठाणे जिल्ह्यात राजकीय फटाके जोराचे फुटू लागले आहेत. विधानसभा निवडणुकीत स्व पक्ष सोडून गेलेले अनेक नेते आता महाविकास आघाडीतील घटक पक्षांना सोड चिट्ठी देऊन अन्य पक्षात जाण्यासाठी सज्ज झाले आहेत.

मुरबाड मधील शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सुभाष पवार यांनी भाजपात प्रवेशासाठी जोरात मोर्चे बांधनी सुरु केली आहे. त्यांचा भाजपा प्रवेश निश्चित झालेला असल्याची माहिती नुकताच त्यांच्या विश्वासू समर्थकांनी दिली.

शिवसेना उबाठा गटाचे संपर्क प्रमुख तारे मामा यांनी ही स्व पक्षातील नाराजी नाट्याला कंटाळून आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी ही भाजपात प्रवेशासाठी चे सर्व सोपास्कर पूर्ण करत जय श्रीराम म्हणत भाजपात प्रवेशाची तयारी केली आहे. अशी माहिती सूत्राकडून देण्यात आली.स्थानिक स्वराज्य संस्थांनाच्या निवडणुकाच्या तारखा जाहीर होण्या पूर्वीच हे पक्ष प्रवेश होतील अशी माहिती प्रदेश भाजपा कार्यालतून देण्यात आली. दरम्यान सुभाष पवार यांनी शरद पवार राष्टवादी काँग्रेस पक्षात फक्त विधानसभा निवडणुकीसाठी प्रवेश केला होता का? असा खोचक सवाल या पक्षाचे विधानसभा संघटन यांनी केला आहे.

# नगराध्यक्षपदासाठी अंबरनाथमध्ये लॉबिंग

## आमदार डॉ. किणीकरांच्या पत्नीच्या नावाची चर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** पुढील काही दिवसात आचारसंहिता जाहीर होऊन नगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. यंदा नगराध्यक्ष पदाची निवडणूक थेट जनतेमधून होणार असल्याने शिवसेना नगराध्यक्ष पदासाठी चाचपणी करत आहे. शिवसेनेत काही नावे पुढे येत असताना आता विद्यमान आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या पत्नी शिल्पा किणीकर यांच्या नावाची चर्चा देखील सर्व स्तरातून होऊ लागली आहे. त्यामुळे नगराध्यक्ष पदाची संधी कुणाला मिळते? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

मागील 25 वर्षांपासून अंबरनाथ नगरपालिकेत शिवसेनेची एक हाती सत्ता आहे. नगरपालिकेत प्रशासकीय राजवट आहे. आता येत्या काही दिवसात आचारसंहिता लागून निवडणुका होणार असल्याने शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. त्यात नगराध्यक्ष पदाची निवडणूक थेट जनतेमधून होणार असून, नगराध्यक्ष पद हे सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित असल्याने शहरातील शिवसेनेच्या नेत्यांनी आपापल्या पत्नीसाठी लॉबिंग सुरू केली आहे. माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी यांच्या पत्नी अनिता सुनील चौधरी, मनिषा अरविंद वाळेकर, माजी नगरसेविका अपर्णा कुणाल भोईर, सुवर्णा सुभाष साळुंके, विना पुरुषोत्तम उगले यांच्या नावाची चर्चा असताना आता त्यात विद्यमान आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या पत्नीचे नाव देखील समोर आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

अंबरनाथमध्ये मागील काही वर्ध्यात शिवसेनेत माजी नगराध्यक्ष अरविंद वाळेकर आणि आमदार डॉ. बालाजी किणीकर असे दोन गट आहेत. या दोन्ही गटाची डोकेदुखी पक्ष्याला सहन करावी लागते. त्यामुळे आता नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत या गटबाजीचा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यात महत्त्वाचे म्हणजे नगराध्यक्ष पदाचे नाव कोणत्या गटाचे समोर येते, किंव्हा गटबाजी झुगारून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे नवीन आश्वासक चेहेऱ्याला संधी देतात का? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# अवकाळीने शहापूर तालुक्यातील 32 हजार हेक्टरवरील पीके उद्ध्वस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर, ता. २६**

पावसाचा हंगाम संपल्यानंतरही शहापूर तालुक्यात गेले काही दिवस कोसळणाऱ्या अवकाळी पावसाने येथील भात आणि नाचणीच्या पिकांचे अतोनात नुकसान केले आहे. शनिवार (ता. २५) रात्रीपासून सुरू झालेल्या या मुसळधार पावसाने दुसऱ्या दिवशीही तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले, ज्यामुळे शेतकरीवर्ग पूर्णपणे हवालदिल झाला आहे. भातपिकाचे २० हजार हेक्टर आणि नाचणीचे १२ हजार हेक्टर, अशा एकूण ३२ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावर पिकांचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. तसेच समाधानकारक सरकारी मदत मिळत नसल्याने तसेच विम्याचे पंचनामे होत नसल्याने शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. शनिवारी रात्री सुरू झालेल्या मुसळधार पावसाने रविवारी दुसऱ्या दिवशीदेखील तालुक्याला झोडपून काढले आहे.

सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले भातपीक शेतातच कुजून गेले आहे. कापणी करून वाळत घातलेल्या भाताला कोंब फुटू लागले आहेत, तर काही ठिकाणी भाताची पेंडी पाण्यात तरंगताना दिसत आहे. खळ्यांमध्ये रचून ठेवलेले पीकही ओलसरपणामुळे सडू लागले आहे.

तालुक्यात पिकांच्या नुकसानीचे पंचनामे अद्यापही पूर्ण झाले नसून गावात एकाच शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन सर्व शेतकऱ्यांना त्याप्रमाणे एकच अंदाज लावून पंचनाम्याच्या एकाच निकषात नोंदले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. महसूल कर्मचाऱ्यांच्या या भूमिकेमुळे शहापूर तालुक्यातील शेतकरी देशोधडीला लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास भविष्यात शेतकरीवर्ग कृषी आणि महसूल विभागाला सहकार्य करणार नाही, असे मत शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### शेतकऱ्यांमध्ये नाराजी

**एकीकडे नैसर्गिक आपत्तीने शेतकऱ्याला रडवले असताना, दुसरीकडे सरकारी मदत मिळत नसल्याने तसेच पंचनामे योग्य निकषांवर होत नसल्याने शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. गावात केवळ एकाच शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन, त्याच निकषांवर सर्व शेतकऱ्यांच्या नुकसानीची नोंद केली जात असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी महसूल कर्मचाऱ्यांवर केला आहे. या नैसर्गिक आपत्तीत लोकप्रतिनिधींनी सरकारी पातळीवर आवाज न उठवल्यामुळे आणि शेतकऱ्यांची साधी चौकशीही न केल्यामुळे, येथील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. नैसर्गिक संकटात सापडलेला शेतकरी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींबद्दल पश्चात्ताप व्यक्त करीत आहेत.**

# जिल्हा परिषदेच्या हजारो मालमत्तांच्या ऑनलाईन नोंदी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २६ :** ठाणे जिल्हा परिषदेचा कारभार पारदर्शक व गतिमान होण्यासाठी हायटेक टेक्नोलॉजीचा वापर करण्यात येत आहे. अशातच जिल्हा परिषदेच्या मालकीच्या मालमत्तांचा शोध घेऊन त्यांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध व्हावी, यासाठी ऑनलाइन प्रणाली तयार करण्यात आली. त्यानुसार नऊ हजार ४४७ मालमत्तांचा शोध घेतला असून, त्यापैकी तीन हजार ३० मालमत्तांच्या ऑनलाइन नोंदी करण्यात आल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक ग्रामपंचायत विभागाच्या दोन हजार ९५२ मालमत्तांची नोंद आहे.

**शहापूरमधील ८१२, मुरबाड तालुक्यातील ६५८, अंबरनाथ तालुक्यातील ३२९ तर, कल्याण तालुक्यातील ३११ मालमत्तांच्या नोंदी**

जिल्हा परिषदेच्या मालकीच्या शहर व तालुक्यांच्या ठिकाणी आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर जागा, मालमत्ता आहेत. या जागांवर अथवा मालमत्तांवर अनेक ठिकाणी अतिक्रमणामुळे आणि संबंधित मालमत्तांची कागदपत्रेच सापडत नसल्यामुळे प्रशासनाची अडचण होत असते. या जागांवर अतिक्रमण झाल्यामुळे त्याचा परिणाम जिल्हा परिषदेच्या महसुलावर होत आहे. याची दखल घेत, तत्कालीन ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी आधुनिकतेची कास धरत, मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्यांची ऑनलाइन नोंद प्रणाली तयार केली. तसेच ठाणे जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या असलेल्या व माहीत नसलेल्या नऊ हजार ४४७ मालमत्तांचा शोध घेण्यात आला. ही डिजिटल प्रणाली केवळ मालमत्ता नोंदीसाठीच नव्हे, तर मालमत्तेचे संरक्षण, नियोजन, सुविधा उपलब्धता, देखभाल आणि उत्पन्न वाढ यासाठीसुद्धा प्रभावी ठरणार असल्याचा विश्वास रोहन घुगे यांनी व्यक्त केला होता.

### भिवंडी तालुक्यातील सर्वाधिक ९२० मालमत्तांच्या नोंदी


ठाणे जिल्ह्यातील पाच तालुक्यांतील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या मालमत्तांचा शोध घेऊन त्यांचे ऑनलाइन प्रणालीद्वारे नोंदणी करण्यात येत आहे. पाच तालुक्यांपैकी भिवंडी तालुक्यात सर्वाधिक ९२० मालमत्तांच्या नोंदी झाल्या असून, त्याखालोखाल शहापूरमधील ८१२, मुरबाड तालुक्यातील ६५८, अंबरनाथ तालुक्यातील ३२९ तर, कल्याण तालुक्यातील ३११ मालमत्तांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत.

# माथेरानच्या राणीला १ नोव्हेंबरचा मुहूर्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दि. 26 / प्रतिनीधी**

**कर्जत : दरवर्षी पावसाळयातील विश्रांतीनंतर माथेरानची राणी पुन्हा एकदा झोकात धावणार आहे. दसरा त्यानंतर दिवाळीचाही मुहूर्त हुकलेली टॉय ट्रेन आता १ नोव्हेंबरला प्रवाशांच्या सेवेत दाखल होईल, अशी घोषणा मध्य रेल्वे प्रशासनाने केली आहे. ठरल्याप्रमाणे आठ दिवसात माथेरानची राणी रुळावर आल्यास हजारो पर्यटकांना दऱ्याखोऱ्यातून निसर्गाचा मनमुराद आनंद घेत नेरळ ते माथेरान प्रवास करता येणार आहे.**



दरवर्षी पावसाळयात दगड, मातीचा मलबा रेल्वे ट्रॅकवर येतो. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी नेरळ-माथेरान टॉय ट्रेन बंद ठेवली जाते. केवळ अमन लॉज ते माथेरान ही शटल सेवाच सुरू असते. त्यामुळे हजारो पर्यटकांना पावसाळयात रस्तेमार्गे माथेरान गाठावे लागते. यंदा रुळाच्या डागडुजीच्या कामाला उशीर झाल्याने टॉय ट्रेन नेहमीपेक्षा एक ते दीड महिना उशिरा धावणार आहे. आधी दसऱ्याला टॉय टेन सरू होईल अशी घोषणा केली होती. त्यानंतर १६ ऑक्टोबरचा वायदा करण्यात आला होता. मात्र ही तारीखदेखील हुकली. आता १ नोव्हेंबरला माथेरानची राणी रुळावर येईल अशी माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील निला यांनी दिली आहे.






## वाचक मनोगत

### अखेर..फराराचे आत्मसमर्पण

साताऱ्याच्या फलटणमधील एका महिला डॉक्टरच्या आत्महत्येप्रकरणातील संशयित फरार आरोपी पीएसआय गोपाल बदने याने आत्मसमर्पण केलं आहे. घटना समोर आल्यापासून हा संशयित आरोपी फरार होता आणि पोलिसांकडून त्याचा शोध सुरू होता. दरम्यान, शनिवारी (25 ऑक्टोबर) बदने स्वतः फलटण पोलीस ठाण्यात हजर झाला. पोलिसांकडून याबाबत अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता अद्याप माहिती देण्यात आलेली नाही. फलटणमधील एका महिला डॉक्टरने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. तळहातावरच लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये या महिलेनं एका पोलीस कर्मचाऱ्यासह आणखी एका व्यक्तीवर गंभीर आरोप केले आहेत.

या सुसाईड नोटमध्ये तिने पोलीस अधिकाऱ्यांसह आणखी एका व्यक्तीवर लैंगिक छळाचे आरोप केले आहेत. या प्रकरणामुळं सातारा जिल्ह्यात खळबळ माजली असून या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. या महिला डॉक्टरने काल गुरुवारी (23 ऑक्टोबर) फलटणमधील एका हॉटेलमध्ये जाऊन आत्महत्या केली. तिने हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये एका पोलीस अधिकाऱ्याचं तसेच आणखी एका व्यक्तीचं नाव लिहिलं आहे. त्यातील एका पोलीस अधिकाऱ्याने आपल्यावर चारवेळा बलात्कार केला, तर दुसऱ्या व्यक्तीने आपला शारिरीक आणि मानसिक छळ केला असल्याचा आरोप या महिला डॉक्टरनं केला आहे.

या महिला डॉक्टरवर चुकीचे पोस्टमार्टम रिपोर्ट्स बनवण्यासाठी राजकीय तसेच पोलिसांकडूनही प्रचंड दबाव असायचा, अशी माहिती तिच्या भावाने दिली आहे. तिला अशा खोट्या रिपोर्ट्ससाठी खासदाराच्या पीएंकडूनही फोन यायचा, असाही आरोप तिच्या नातेवाईकांनी केला आहे. यासंदर्भात माध्यमांशी बोलताना तिच्या भावाने म्हटलं की, "मागील वर्षभरापासून तिला चुकीचे पोस्टमार्टम रिपोर्ट बनवण्यासाठी राजकीय तसेच पोलीसांचं खूप प्रेशर असायचं. ती तिच्या बहिणीला यासंदर्भात वारंवार सांगायची. परंतु, तिच्यावर एवढा दबाव असेल, असं वाटलं नव्हतं. परंतु, शेवटी त्या त्रासाला कंटाळून आणि तिला ते सहन न झाल्याने तिने काल आत्महत्या केली आहे." पुढे त्यांनी म्हटलंय की, "ज्या पोलीस अधिकाऱ्याचा तिला त्रास होत होता, त्यांचीही नावे तिने हातावर लिहिली आहेत. तसेच, यासंदर्भात तक्रार करण्यासाठी मागील दोन वर्षांपासून तिने डिवायएसपी आणि एसपींना लेटर्सही लिहिले आहेत. त्यांची आवक-जावक नोंदही झालेली आहे. परंतु, तिच्या तक्रारीवर कोणतीही कारवाई आजवर झालेली नाही. तसेच, काही माहिती मिळवण्यासाठी तिने आरटीआयही टाकला होता, मात्र तिला प्रतिसाद मिळाला नाही."

दोन व्यक्तींची नावे या पीडित महिला डॉक्टरने आपल्या सुसाईड नोटमध्ये लिहिली आहेत, त्यापैकी प्रशांत बनकर या एका आरोपीला अटक करण्यात आली होती. तर दुसऱ्या आरोपीने स्वतः पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं आहे. तो शनिवारी फलटण पोलिसांत स्वतः हजर झाला. प्रशांत बनकर या आरोपीला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. फलटण पोलिसांनी ही कारवाई केली असून अटक केल्यानंतर त्याला फलटणच्या न्यायालयामध्ये हजर करण्यात आलं. त्याला 28 ऑक्टोबरपर्यंत चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे यातील ज्या पोलीस अधिकाऱ्यावर चारवेळा बलात्कार करण्याचा आरोप पीडित महिला डॉक्टरने केला आहे, त्याला निलंबित करण्यात आलं आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी दिली आहे.

# फुटबॉल मधील भविष्यातील हिरे घडविण्यासाठी
# क्रीडा विभागाचा प्रोजेक्ट "महादेवा"

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, दि.26 :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली "प्रोजेक्ट महादेवा" ही योजना महाराष्ट्रातील 13 वर्षांखालील मुलगा-मुलींच्या फुटबॉल कौशल्याचा शोध घेण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. निवड प्रक्रिया तीन टप्प्यांत पार पडणार आहे – जिल्हास्तरावरील निवड चाचण्या, प्रादेशिक फेरी आणि अंतिम निवड फेरी. अंतिम टप्प्यात 60 मुलांची निवड सीआयडीसीओ ग्राऊंड, खारघर येथे आणि 60 मुलींची निवड डब्ल्यूआयएफए कूपरेज मैदान, मुंबई येथे केली जाईल. यापैकी प्रत्येकी 30 मुलगा-मुलींची निवड केली जाईल आणि त्यांना पाच वर्षांची एकात्मिक शिष्यवृत्ती दिली जाईल, ज्यामध्ये फुटबॉल प्रशिक्षणासोबत शैक्षणिक विकासाचाही समावेश असेल. निवड झालेल्या खेळाडूंना 14 डिसेंबर रोजी मुंबईत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्टार लिओनेल मेस्सी यांच्या फुटबॉल क्लिनिकमध्ये सहभागी होण्याची अनोखी संधी मिळेल. ही योजना MITRA, क्रीडा विभाग, WIFA, CIDCO आणि VSTF यांच्या संयुक्त विद्यमाने राबविली जात असून, राज्यातील फुटबॉल क्षेत्र अधिक मजबूत करण्याचा उद्देश आहे. इच्छुक खेळाडूंनी निवड चाचण्यांपूर्वी दिलेल्या गूगल फॉर्मद्वारे नोंदणी 26 October पर्यंत करणे आवश्यक आहे. यानुषंगाने ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंची निवड चाचणी दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ रोजी मुले व ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी मुली श्री. यशवंतराव चव्हाण फुटबॉल मैदान, सेक्टर १९, नेरूळ, नवी मुंबई येथील क्रीडांगणात सकाळी ८.०० वाजेपासून आयोजित करण्यात येणार आहे. या निवड चाचणी मध्ये सहभागी होण्याकरिता खेळाडूंनी आहे .https://forms.gle/ctCMRZ4FZDxwYEvA7 या गुगल लिंक द्वारे नोंदणी करावी.



## निवड चाचणी संदर्भात महत्वाच्या सूचना

1. सर्व खेळाडूंनी चाचणी स्थळी येण्यापूर्वी गुगल नोंदणी लिंकद्वारे (Google registration link) आपली नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे..
2. या निवड चाचणी मध्ये १ जानेवारी २०१२ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले आणि ३१ डिसेंबर २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी जन्मलेले खेळाडू सहभागी होवू शकतील.
3. सर्व खेळाडूंनी त्यांचे मूळ आधार कार्ड आणि जन्म प्रमाणपत्र सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.
4. ठाणे जिल्हास्तर निवड चाचणीत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पहिल्या २० खेळाडूंची निवड ही विभागस्तरीय निवड चाचणीसाठी करण्यात येईल.

**तरी "महादेवा" या महत्त्वाकांक्षी योजनेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुवर्णा बारटक्के यांनी केले आहे.**

# कल्याण शहरात पोलिसांचे ऑपरेशन ऑल आऊट

## भुरटे चोर, मद्यपी, समाजकंटकांसह 350 जणांवर कारवाई

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**कल्याण :** कल्याण-डोंबिवली परिसरात मागील काही दिवसांपासून भुरट्या चोऱ्या, तसेच रात्रीच्या वेळेत सार्वजनिक ठिकाणांवर मद्य आणि अंमली पदार्थांचे सेवन, तसेच छुप्या गैरधंद्यांचे अड्डे वाढीस लागल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर कल्याण पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी रात्री मोठी छापा मोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेत एकूण २४० पोलिस अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. रात्री आठ ते पहाटे चार या वेळेत कल्याण आणि डोंबिवली शहरातील विविध भागांत एकाच वेळी धरपकड मोहीम राबवण्यात आली. यामध्ये ३५० हून अधिक समाजकंटक, गुंड, मद्यपी आणि गैरधंदे करणाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले.

गेल्या वर्षीही अशाच प्रकारची मोहीम सलग दोन ते तीन महिने राबवून पोलीस दलाने शहरातील अनेक गैरधंदे, अड्डे उद्ध्वस्त केले होते. सार्वजनिक ठिकाणी मद्य व अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागले होते. ही मोहीम 'कल्याण-डोंबिवली नशामुक्त शहर' या उद्दिष्टाचा भाग असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अलीकडे पुन्हा काही अड्डे आणि अवैध व्यवहार सुरू झाल्याची माहिती मिळाल्यानंतर उपायुक्त झेंडे यांनी आठही पोलिस ठाण्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अचानक आदेश देऊन शनिवारी रात्री धडक छापा टाकण्याचे निर्देश दिले. या कारवाईत उपायुक्त झेंडे आणि साहाय्यक पोलीस आयुक्त स्वतः सहभागी झाले.

कल्याण रेल्वे स्थानक परिसर, वाहनतळ, आणि झाडाझुडपांमध्ये लपून मद्य व अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांना पोलिसांनी वेढा घालून ताब्यात घेतले. काहींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी चारही बाजूंनी घेराव घालून त्यांना पकडले. अनेक ठिकाणी पकडलेल्या व्यक्तींना परिसरातून पोलिसांनी वरात काढत पोलिस ठाण्यात आणले.

या कारवाईत मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांकडून तब्बल ४५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच सहा खतरनाक गुंडांना अटक करण्यात आली, तर २७ तडीपार गुंडांची चौकशी करण्यात आली.

या मोहिमेत पकडलेल्या मद्यपींमध्ये काही सुस्थितीत घरातील तरुणांचाही समावेश असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. सर्व आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून न्यायालयीन कारवाई सुरू आहे. रात्री आठपासून पहाटे चारपर्यंत कारवाई सुरू होती.

# उल्हासनगर : काँग्रेस नेते डॉ. प्रशांत इंगळेंवर बिहार विधानसभा निवडणुकीची जबाबदारी

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**उल्हासनगर -** गेली बारा वर्ष विविध मुख्य पदावर काम केल्यावर बीएसपीला सोडचिठ्ठी देणारे आणि काँग्रेसमध्ये प्रवेश करणारे उल्हासनगरातील डॉ. प्रशांत इंगळे यांच्यावर काँग्रेसने बिहार विधानसभा निवडणुकीत सितामढी जिल्ह्यातील पतनाह मतदार संघात निरीक्षक पदाची मोठी जबाबदारी सोपवली आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली मायनॉरीटी सेलचे अध्यक्ष खासदार इमरान प्रतापगडी यांनी डॉ. प्रशांत इंगळे यांची अनुसूचित जाती साठी राखीव असणाऱ्या सितामढी जिल्ह्यातील पतनाह मतदार संघात निरीक्षक पदावर नियुक्ती केली आहे. बीएसपीला सोडचिठ्ठी ही प्रशांत इंगळे यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरली आहे.

नोव्हेंबर महिन्यात बिहार विधानसभेची निवडणूक ही दोन टप्प्यात होणार असून पतनाह मतदार संघाची निवडणूक ही 11 नोव्हेंबर रोजी होत आहे. पक्षाने सोपवलेली जबाबदारी इमानेइतबारे निभावणार आणि बिहार मध्ये महागठबंधन निवडणूक येणार असा विश्वास डॉ. इंगळे यांनी व्यक्त केला आहे.

## नवा रेल्वे प्रकल्प अंतिम टप्प्यात
# पनवेल - कर्जत प्रवास तासाभरात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

पनवेल ते कर्जत दरम्यानचा प्रवासाचा वेळ लवकरच कमी होईल. कारण या रेल्वे कॉरिडॉरचे काम अंतिम टप्प्यात आहे. अहवालानुसार, कॉरिडॉरचा ७९% भाग पूर्ण झाला आहे. मार्च २०२६ पर्यंत तो जनतेसाठी खुला होईल. पनवेल ते कर्जत दरम्यानचा हा २९.६ किलोमीटरचा मार्ग भविष्यात लोकांसाठी प्रवास सोपा करेल, ज्यासाठी २,७८२ कोटी रुपये गुंतवणुकीची आवश्यकता आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, या कॉरिडॉरमुळे प्रवाशांचा प्रवासाचा वेळ अंदाजे ३० मिनिटांची बचत होईल. हा प्रकल्प जानेवारी २०२६ च्या अखेरीस पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. सध्या स्थानकांवर कुंपण बसवले जात आहे. जे पूर्वी वापरल्या जाणाऱ्या कुंपणापेक्षा वेगळे आहे. पनवेल, चिखले, मोहोपे, चौक आणि कर्जत स्थानकांवर प्रवासी सुविधा आणि कार्यरत इमारती पूर्णत्वाच्या जवळ आहेत.

विस्तारित रेल्वे नेटवर्क पूर्ण झाल्यानंतर हा प्रकल्प पनवेल आणि कर्जत दरम्यानचा प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी करेल. ज्यामुळे अखंड कनेक्टिव्हिटी मिळेल. मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या प्रवाशांच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. या कॉरिडॉरमुळे पनवेल आणि कर्जत दरम्यान एक महत्त्वाचा उपनगरीय दुवा निर्माण होईल. नवी मुंबई, रायगड आणि आसपासच्या परिसरांना रेल्वे जोडणी वाढेल आणि दैनंदिन प्रवाशांचा प्रवास वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल.



**एमआरव्हीसीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विलास सोपान वाडेकर म्हणाले की, पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे कॉरिडॉरमुळे या प्रदेशाला एक नवीन आणि जलद पर्यायी मार्ग मिळेल. ज्यामुळे कर्जतचा प्रवास सध्याच्या कल्याण मार्गापेक्षा कमी वेळ घेणारा होईल. यामुळे प्रवाशांची सोय आणि कनेक्टिव्हिटी सुधारेलच. शिवाय आजूबाजूच्या परिसरातील आर्थिक घडामोडींनाही चालना मिळेल. हा प्रकल्प प्रादेशिक विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. या आर्थिक वर्षात तो जनतेसाठी खुला केला जाईल.**

हे काम मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प (MUTP) 3 अंतर्गत MRVC द्वारे केले जात आहे. अधिकाऱ्याने स्पष्ट केले की पनवेल आणि कर्जतमधील पूल, बोगदे, स्टेशन इमारती आणि रेल्वे उड्डाणपुलांसह प्रमुख नागरी कामे अंतिम टप्प्यात आहेत. या प्रकल्पात आधुनिक अभियांत्रिकी डिझाइन आणि पर्यावरणीय चिंता लक्षात घेऊन पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी प्राधान्याने वन मंजुरीचा समावेश आहे.

# दिवाळी निमित्त पनवेल शहरात रात्रपाळीत कचरा संकलन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल :** प्रकाश, आनंदाच्या दिवाळी सणानिमित्त नागरिकांचे आरोग्य, स्वच्छ वातावरण राहावे, यासाठी पनवेल पालिकेमार्फत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी शहराच्या विविध भागांमध्ये रात्रपाळीमध्ये घनकचरा संकलन करण्यात आले.

पनवेल महापालिकेच्या स्वच्छता विभागाने सण काळात नागरिकांकडून निर्माण होणारा कचरा वर्गीकृत स्वरूपात देण्याचे आवाहन केले होते. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे देण्याचे भान राखल्यामुळे मोहिमेला अधिक यश मिळाले.

स्वच्छ पनवेल, प्रगतशील पनवेल या ध्येयाने कार्यरत असलेल्या महापालिकेने विशेष मोहिमेद्वारे दिवाळी सण काळात स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला. शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा, सार्वजनिक ठिकाणे, वसाहती परिसर याठिकाणी रात्रपाळीमध्ये सातत्याने स्वच्छतेची कामे करण्यात आली. दैनंदिन कचरा उचलण्याच्या कामकाजातून संबंधित विभागाने रात्रीची विशेष मोहीम राबवली होती.

**१४० टन कचरा संकलित**

या मोहिमेअंतर्गत १०४ सफाई कर्मचाऱ्यांनी दररोज ४१.८ किलोमीटर लांबीच्या प्रमुख रस्त्यांची सखोल सफाई करण्यात आली. या कर्मचाऱ्यांनी रात्रीच्या वेळी सणानिमित्त झालेल्या कचऱ्याचे त्वरित संकलन केले. या विशेष मोहिमेत नऊ घंटागाड्या, सात टिपर, एक जेसीबी आणि एक हायड्रा वाहनांचा वापर करण्यात आला. दिवाळीच्या काळात विशेषतः फटाके, सजावट साहित्य, फुलांची पाने, पूजन साहित्याचा १४० टन कचरा संकलित केला गेला.

# भिवंडीत दोन गटांत राडा

## माजी महापौरांसह ३० जणांविरोधात गुन्हे दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे पडघम वाजू लागताच हाणामारीच्या घटना वाढू लागल्या आहेत. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कोंबडपाडा येथील गावदेवी मंदिर परिसरात कार्यक्रम आयोजनाच्या वादातून दोन गटांत हाणामारीची घटना घडली. याप्रकरणी माजी महापौर विलास पाटील यांच्यासह दोन्ही गटांतील एकूण ३० जणांविरुद्ध निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोंबडपाडा येथील गावदेवी मंदिरात दिवाळीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मंगळवारी (ता. २१) रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास माजी महापौर विलास आर. पाटील यांनी मंडप डेकोरेटरला मंदिर परिसरात पाठवले; मात्र तेथे रोहित संतोष जाधव यांनी आधीच कार्यक्रम सुरू केल्याने मंडप टाकण्यास विरोध केला. यामुळे माजी महापौर विलास पाटील, त्यांचे भाऊ, मुले आणि सहकारी त्या ठिकाणी आले असता त्यांच्यात वाद झाला.

रोहित जाधव यांच्या तक्रारीनुसार, या वादानंतर विलास पाटील, त्यांचे पुत्र मयूरेश पाटील, मयूर पाटील, भाऊ अजय पाटील, नितीन पाटील आणि सहकारी राकेश निकम, जय कोटे यांनी रोहित जाधव यांचे आई-वडील व भावंडांना हाताने मारहाण केली तसेच जातीवाचक शिवीगाळ केली. रोहित जाधव यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी या सात जणांविरोधात मारहाणीसह अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

**याच वादात मयूरेश विलास पाटील यांनीही तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीनुसार विकास बाफना, संतोष जाधव, चेतन जाधव, मंदा जाधव, रोहित जाधव, विकी जाधव, बंटी जाधव, अजय भोईर, विनय ईगा, गणेश जाधव, निखिल चिल्का, सोनल जाधव, रेखा जाधव, रूपा जाधव आणि चार अनोळखी व्यक्ती (एकूण १८ जण) यांनी एकत्र येऊन शिवीगाळ व मारहाण करण्याच्या उद्देशाने मंदिराचे गेट बंद केले. त्यांनी आपल्याला बाहेर जाण्यापासून रोखून धरत दंगलीचे वातावरण निर्माण केले. आरोपी विकास बाफना याने जाधव कुटुंबीय आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आपल्याला मारहाण करण्यासाठी चिथावणी दिली, असे मयूरेश पाटील यांनी म्हटले आहे.**

## राष्ट्रीय युवा महोत्सवानिमित्त
# रायगड जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** युवकांचा सर्वांगीण विकास साधणे, भारतीय संस्कृती व परंपरा जपणे तसेच युवकांच्या सुप्त गुणांना वाव देत राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणे या उद्देशाने युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. याच पार्श्वभूमीवर सन २०२५-२६ या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सव विकसित भारत चॅलेंज ट्रॅक दि. १० ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. त्याअनुषंगाने रायगड जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे. या महोत्सवात युवकांसाठी विविध स्पर्धात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, कथालेखन, चित्रकला, लोकनृत्य (गट), लोकगीत (गट), कवितालेखन, नवोपक्रम (विज्ञानदर्शन) या उपक्रमांचा समावेश आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या १५ ते २९ वयोगटातील युवक-युवती तसेच युवा मंडळांनी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं ५ वाजेपर्यंत आपली online नोंदणी dscraigad.2009@rediffmail.com या ई-मेलद्वारे करावी.

अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी, प्रकाश वाघ यांनी केले आहे.

# भविष्यवेध



**सोमवार**
**27 ऑक्टोबर 2025**

**मेष**
धर्मात आस्था वाढेल. मार्ग प्रशस्त होईल. हुशारीने गुंतवलेले धन आपणास ध्येयाजवळ घेऊन जाईल. जोखिम असलेले कार्ये टाळा. जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये.

**वृषभ**
सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल. नाते वाईकांशी भेट होईल. आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**मिथुन**
आरोग्य मध्यम राहील. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. नाराजी दूर होईल.

**कर्क**
नवे काम, विचार, योजना लांबणीवर ठेवा. आर्थिक विवादातून नुकसान संभव. आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**सिंह**
व्यापार उत्तम चालेल. सामाजिक कामात सक्रिय सहयोग मिळेल. मुलांच्या तब्बेतीची काळजी दूर होईल. दिवस नवी सुरुवात करण्यास किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय ठरावण्यास साहाय्यक असू शकतो.

**कन्या**
विशेष महत्वाच्या आर्थिक कामात भाग्यवर्धक यश. वित्तीय कामांसाठी विशेष यात्रा. गूढ अनुसंधान संबंधी कार्ये होतील. आवडीच्या नातलगांना भेटा व स्वतःबद्दल त्यांची प्रतिक्रिया मिळवा.

**तुळ**
आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. ज्या व्यक्तीकडे फुकट घालवण्यासाठी वेळ आहे त्याचे ऐकण्याचा प्रयत्न करा आणि त्याला सल्ला द्या. यश प्राप्ति होईल.

**वृश्चिक**
योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. आध्यात्मात मन रमेल. उत्पन्न वाढीबाबत योजना बनवू शकता.

**धनु**
गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो. मतभेद दूर होतील.

**मकर**
धार्मिक आयोजनात सहभागी व्हाल. भौतिक सुख प्राप्त होईल. विद्यार्थींच मन अभ्यासात रमेल. कौटुंबिक मतभेद दूर होतील.आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या.

**कुंभ**
योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा. घरातील वातावरण आनंददायी राहील. सामाजिक कामात सहयोग मिळेल.

**मिन**
सामाजिक क्षेत्रात लाभ प्राप्तिचा योग. गूढ कार्यात यश प्राप्ति .सामाजिक क्षेत्रात धार्मिक अनुसंधानाचा योग. व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. प्रेमीजनांसाठी दिवस आनंदाने परिपूर्ण.



# ठाणे शहरात रविवारी दिवसभर पावसाच्या हलक्या सरी...

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** - हवामान खात्याने ऑक्टोबर अखेर पर्यंत पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज वर्तविला आहे. त्यानुसार, रविवारी ठाणे शहरात दिवसभर पावसाच्या हलक्या सरी पडत आहेत. पावसाच्या या हलक्या सरींमुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. मे महिन्यात सुरू झालेला पाऊस ऑक्टोबर संपत आला तरी थांबताना दिसत नाही. ऐन दिवाळीत देखील पाऊस कोसळला. मात्र हा पाऊस ऑक्टोबर अखेरपर्यंत कोसळण्याचा अंदाज हवामान अभ्यासकांनी वर्तवला आहे. यंदाच्या वर्षात पूर्वमोसमी पाऊस कोसळला, नंतर मोसमी पाऊस आणि त्यानंतर उत्तर मोसमी पाऊसही सुरूच आहे. त्यामुळे पावसाचा काळ जवळपास सहा महिने झाला आहे. यंदाचे निम्मे वर्ष पावसात गेले आहे. आणखी काही काळ याच पावसाचा सामना करावा लागणार आहे. दिवाळीनंतरही महाराष्ट्रात सुरू असलेल्या पावसामुळे अनेक नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित झाला आहे. गेले काही दिवसांपासून ऐन सकाळ आणि दुपारच्या वेळी कडक उन्ह पडत होते. या उष्ण वातावरणामुळे नागरिक हैराण झाले होते. त्यांनंतर, सायंकाळच्यावेळी पावसाची एक सर येऊन जात होती. त्यानंतर पुन्हा वातावरणाता उष्णाता निर्माण होत. परंतू, रविवारी सकाळपासूनच ठाणे शहरात पावसाने हजेरी लावली. पावसाच्या हलक्या सरी दिवसभर कोसळत आहेत. तर, वातावरण देखील मळभ झाले असून गारवा निर्माण झाला आहे. यामुळे उकाड्या पासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. ठाणे शहरात रविवारी सकाळी ८.३० ते सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत ६.३४ मिमी पाऊस पडल्याची नोंद ठाणे महापालिका आपत्ती विभागाकडे करण्यात आली आहे.

# इतर 'उद्योग-धंद्यांसाठी' 'आपला दवाखान्या'चा वापर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे शहरात ४० ठिकाणी सुरू करण्यात आलेला 'आपला दवाखाना' हा उपक्रम बंद पडला आहे. संबंधित कंत्राटदार कंपनीने येथील कार्यरत परिचारिकांचे पगार थकवल्याच्या तक्रारी खोपट येथील भाजप कार्यालयात 'जनसेवकाचा जनसंवाद' या कार्यक्रमात आमदार संजय केळकर यांच्याकडे करत न्यायाची मागणी केली आहे. हे दवाखाने बंद पडल्याने त्याचा ताबा इतर व्यवसायिकांनी घेत त्याचा अन्य 'उद्योग' धंद्यांसाठी होत असल्याचीदेखील चर्चा आहे. शहरात ४० ठिकाणी सुरू असलेल्या या दवाखान्यांमध्ये काम करणारे कर्मचारी आणि परिचारिका बेरोजगार झाले असून त्यांचा सहा महिन्यांचा पगारदेखील थकला आहे. तो मिळवून देण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी आ.केळकर यांच्याकडे निवेदन देऊन केली. यावेळी माजी उप महापौर अशोक भोईर, माजी नगरसेवक भरत चव्हाण, राजेश गाडे आदी उपस्थित होते.

याबाबत बोलताना संजय केळकर यांनी सांगितले की, आपला दवाखाना हा उपक्रम राबवण्यासाठी ठाणे महापालिकेने बंगळुरु येथील मेडको नावाच्या कंपनीला कंत्राट दिले होते. ऑक्टोबरपर्यंत या कंपनीकडे कंत्राट होते, मात्र ऑगस्टमध्येच हे दवाखाने बंद पडले. तत्पूर्वी मागील सहा महिन्यांचा पगारदेखील कंपनीने कर्मचाऱ्यांना दिला नाही. कर्मचाऱ्यांची दिवाळीदेखील कोरडी गेली. या कंपनीला ५६ लाखांचा दंड ठोठावण्यात आल्याचे प्रशासनाचे म्हणणे असले तरी ही कंपनी पालिकेला दाद देत नाही. त्यामुळे पालिकेने कंपनीकडून सर्व दंड वसूल करून कर्मचाऱ्यांचे रखडलेले पगार द्यावेत आणि संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकावे", अशी मागणी केळकर यांनी केली. ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी अन्यथा या कर्मचाऱ्यांचा पालिका मुख्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही आ. केळकर यांनी दिला आहे.

"एखादा उपक्रम सुरू करायचा, तो बंद पडला की दुसरा उपक्रम सुरू करायचा. पालिका म्हणजे प्रयोगशाळा नाही. लोकांना थातुरमातुर सेवा देणारी यंत्रणा नको, सक्षम आरोग्यसेवा देणारी यंत्रणा महापालिकेने उभी करायला हवी", असे मतही आ. केळकर यांनी मांडले. बंद पडलेल्या दवाखान्यांच्या अनेक ठिकाणी इतर व्यवसाय सुरू झाल्याचे दिसत असून एके ठिकाणी तर साड्यांचे दुकान सुरू झाले आहे. त्यामुळे या जागादेखील गिळंकृत होण्याची भीती व्यक्त होत आहे.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

महापालिका प्रशासकीय इमारत, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम)

### निवडणूक विभाग

**निविदा सूचना क्र. ०१/ २०२५-२६**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता खाली नमूद कामाकरीता ई- निविदा कार्यप्रणालीद्वारे अनुभवी एजन्सीकडून बी २ नमुन्याकडून निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | निविदा इसारा रक्कम | कालावधी | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | मतदार याद्या छपाई करणे | ६०,०००/- | १ वर्षे | ११,८००/- (१८% जीएसटीसह नापरतावा) |

| | |
|---|---|
| * | कोरे निविदा फॉर्म व निविदाबाबतची संपूर्ण माहिती महापालिकेच्या www.mahateders.com या संकेतस्थळावर दिनांक २७/१०/२०२५ ते दिनांक ०३/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. |
| * | ई- टेंडरींग पध्दतीने निविदा दिनांक २७/१०/२०२५ ते दिनांक ०३/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. |
| * | प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास दिनांक ०४/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थितीत निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष ई- टेंडर विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका येथे उघडण्यात येतील. |
| * | एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवले आहेत. |

कडोंमपा/जसंवि/मुका/ ६०२
दिनांक :- २४/१०/२०२५

सही/-
(रमेश मिसाळ)
उपआयुक्त (निवडणूक)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका


# सतीश शाह यांना अखेरचा निरोप पवनहंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**मुंबई, ता. २६** : बहुआयामी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना आज मुंबईत अखेरचा निरोप देण्यात आला. विलेपार्ले येथील पवनहंस स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी बॉलीवूड आणि दूरचित्रवाणी क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. गेल्या काही दिवसांपासून शाह मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त होते. नुकतीच त्यांच्यावर प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली होती; मात्र शनिवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हिंदुजा रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. शाह यांच्या अंत्यदर्शनासाठी चित्रपटसृष्टीतील अनेक जण उपस्थित होते. त्यामध्ये अभिनेते दिलीप जोशी, जॉनी लिव्हर, नसिरुद्दीन शाह, देवेन भोजनी, अंजन श्रीवास्तव, जॅकी श्रॉफ, सुप्रिया पाठक, पंकज कपूर, दिग्दर्शक डेव्हिड धवन, कुणाल कोहली, निर्माते अशोक पंडित, तसेच 'साराभाई व्हर्सेस साराभाई' मालिकेतील सहकलाकार सुमीत राघवन, रूपाली गांगुली, रत्ना पाठक-शाह आणि राजेश कुमार यांनी त्यांचे अंतिम दर्शन घेतले.

# वंदे भारतमुळे नोकरदारांना २० मिनिटांचा लेट मार्क



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : पुणे मार्गावरून धावणाऱ्या जालना आणि सोलापूर वंदे भारत एक्स्प्रेसमुळे कर्जत लोकलला मोठा थांबा मिळत असल्याने चाकरमान्यांना लेट मार्क लागत आहे. वंदे भारत या गाड्या नॉन स्टॉप धावत असल्याने बाकीच्या गाड्या थांबविल्या जातात. यामुळे या गाड्यांना 15 ते 20 मिनिटांचा लेट मार्क लागत आहे.कर्जत-खोपोली रेल्वे मार्गावर ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीच्या काही दिवसांपासून कर्जत-पनवेल कोस्टल रेल्वे लाईनचे काम सुरू आहे. यात रेल्वेरुळांच्या दुरुस्तीचे कामाला गती मिळालेली आहे. परंतु रेल्वे मार्गाच्या कामामुळे कर्जत रेल्वे स्थानकातून अप मार्गावर नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे मात्र हाल झाल्याचे दिसून येतात. प्रामुख्याने हे काम सुरू असल्याने वंदे भारतसारख्या एक्स्प्रेस गाड्या लोकल ट्रॅकवरून धावत असल्याने लोकल गाड्यांना 20 ते 30 मिनिटांचा सिग्नल मिळू लागला आहे.

रेल्वे रुळाच्या कामामुळे रेल्वे प्रशासनाकडून कर्जत 3 आणि 4 रेल्वे लाईन बंद करून त्या मार्गावरच्या लोकल सेवांना 1,2,5 आणि 6 रेल्वे मार्गावर वळवण्यात आले असून 5 आणि 6 रेल्वेमार्ग लांब पल्ल्याच्या एक्स्प्रेस रेल्वेसाठी निश्चित केले होते. मात्र अलीकडे 5 आणि 6 रेल्वे मार्गावर देखील लोकल रवाना करण्यात येत आहेत. परिणामी लोकलच्या नियमित होणाऱ्या रहदारीला रेल्वे प्रशासनाकडून मोठा थांबा देण्यात येतो. यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना लेट मार्क बसत आहे.

24 ऑक्टोबर, रोजी रेल्वे प्रशासनातर्फे वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वेच्या फेऱ्या वाढीचे निर्णय घेण्यात आला. त्यामुळे लोकल रेल्वेवर त्याचा आणखी परिणाम झाला आहे. यापूर्वी वंदे भारत एक्सप्रेस फक्त आठवड्यातील सोमवारी, बुधवारी आणि शुक्रवारी धावत होती. मात्र त्यावेळी तीनच दिवस लेट मार्क बसायचा आता एक्स्प्रेस गाड्या वाढल्याने लोकलचा प्रवास आणखी धीमा झाला आहे.

# उद्या कल्याण शहराचे पाणी नऊ तास बंद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

**कल्याण : कल्याण शहराचा आणि कल्याण शहरा लगतच्या ग्रामीण भागाचा पाणी पुरवठा मंगळवारी (ता. २८) बारावे आणि मोहिली येथील कच्चे पाणी उचलण्याच्या यांत्रिक मार्गिकतील गाळ काढण्याच्या कामासाठी सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा या वेळेत बंद ठेवण्यात येणार आहे. या पाणी पुरवठा बंदमुळे कल्याण पूर्व आणि पश्चिम, तसेच कल्याण शहरा लगतच्या ग्रामीण भागातील वडवली, शहाड, टिटवाळा, मांडा परिसराला मंगळवारी कल्याण डोंबिवली पालिकेकडून पाणी पुरवठा होणार नाही.**

बारावे आणि मोहिली येथील उदंचन आणि जलशुध्दीकरण केंद्रात उल्हास नदीतून पाणी उचलले जाते. हे पाणी उचलताना नदी पात्रातून वाहून येणारा पालापाचोळा, डोंगर-दऱ्यातून वाहून येणारी माती नदी पात्रातून पालिकेच्या पाणी उचलण्याच्या मोहिली, बारावे येथील यंत्रणेत अडकते. ही यंत्रणा वेळच्या वेळी साफ केली नाही तर उदंचन केंद्राजवळील यंत्रणा नादुरुस्त होऊन पाणी पुरवठा उचलण्या अडथळे येतात. गेल्या पाच महिन्याच्या काळात यंत्रणेत अडकलेला गाळ, माती काढण्यासाठी पालिकेने आठ ते दहा वेळा पाणी पुरवठा बंद ठेऊन ही कामे पूर्ण केली आहेत. आता पावसाचे प्रमाण कमी झाल्याने गेल्या महिनाभराच्या कालावधीत वाहून आलेला गाळ, माती, पालापाचोळा कच्चे पाणी उचलण्याच्या मार्गिकतून काढण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे पालिकेने हे काम येत्या मंगळवारी करण्याचे नियोजन केले आहे. हे यांत्रिक काम पूर्ण करण्यासाठी नऊ तास लागणार आहेत. या उदंचन केंद्रातून होणारा पाणी पुरवठा त्यामुळे बंद ठेवण्यात येणार आहे, असे पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्याने सांगितले. या कालावधीत विद्युत उपकरणांचीही देखभाल केली जाणार आहे. कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी, चिंचपाडा, कैलासनगर, वालधुनी, विजयनगर, नेतिवली, चक्कीनाका, पत्रीपूल, लोकग्राम, कल्याण पश्चिमेतील मुरबाड रस्ता, बेतुरकरपाडा, बिर्ला महाविद्यालय परिसर, खडकपाडा, पारनाका, दूधनाका, गोविंदवाडी, आधारवाडी, गंधारे, बारावे, शहाड, आंबिवली, मोहने, धाकटे शहाड, बंदरपाडा, अटाळी परिसराचा मंगळवारी बंद राहणार आहे. नऊ तासाच्या पाणी पुरवठा बंदमुळे दुसऱ्या दिवशी कमी दाबाने पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी एक दिवस पुरेल इतका पाणी साठा करून ठेवावा, असे आवाहन पालिकेने केले आहे. एमआयडीसीकडून कल्याण, डोंबिवली शहरांच्या परिसराला होणारा पाणी पुरवठा सुरळीत राहणार आहे.

# भिवंडीत दिवाळी निमित्त किल्ल्यांची प्रतिकृती उभारणाऱ्या मंडळाना पारितोषिके



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी) :** भिवंडी शहरातील कोंबडपाडा संघर्ष समितीच्या माध्यमातून शालेय विद्यार्थी व युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याची माहिती इतिहास जागृत रहावा यासाठी दिवाळी निमित्त किल्ले दर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत 50 हुन अधिक स्पर्धेक नवयुवकांनी सहभागी होत आकर्षक असे लाल मातीचे किल्ले तयार करून नागरिकांना आकर्षित केले होते.त्यामुळे गुणवंत कलाकार मंडळाना कोंबडपाडा संघर्ष समितीच्या माध्यमातून रोख रक्कम व ट्रॉफी पारितोषिक वितरण करण्याचा कार्यक्रम काल सायंकाळी भिवंडीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

भिवंडी पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश चौघुले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे भिवंडीत मंदिर उभारणारे राजूभाऊ चौधरी,कोंबडपाडा संघर्ष समितीचे प्रमुख कृष्णा गाजेंगी, भाजप शहरध्यक्ष रवी सावंत अदि मान्यवरांच्या हस्ते मातीचे सुंदर किल्ले तयार करण्यात आलेल्या मंडळाना पारितोषिक देण्यात आली.

"इतिहास जपूया ,परंपरा जगवू या "अंधारासाठी दिवा पाहिजे, आणि हिंदुस्थानासाठी शिवबा सारखा युवा पाहिजे 'असे आवाहन करून सर्व स्पर्धकांचे उपस्थितीत पाहुण्यांनी अभिनंदन केले.आपल्या हिंदवी स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या गड किल्ल्यांचे जतन,संवर्धन,संरक्षण अणि किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा तरुण पिढी पर्यंत पोहचवण्याच्या उद्देशाने कोंबडपाडा संघर्ष समिती किल्ले दर्शन स्पर्धा आयोजित केल्याची माहिती संघर्ष समितीचे प्रमुख कृष्णा गाजेंगी यांनी दिली. गेल्या चार वर्षांपासून ही स्पर्धा आयोजित करत असल्याचे त्यांनी सांगितले.

ही स्पर्धा मोठा गट आणि लहान गट अशया दोन गटांत विभागलेली होती. मोठ्या गटात जय बजरंग मित्र मंडळ (कोंढाणा किल्ला) साकारून प्रथम क्रमांक मिळवला भैरव कृपा मंडळ (द्वितीय क्रमांक)

जय श्रीराम मित्र मंडळ (तृतीय क्रमांक)शिवराजे ग्रुप,शिव स्वरुप मित्र मंडळाने पारितोषिक मिळवले तर लहान गटात श्री. स्वामी समर्थ ग्रुप मंडळाने खांदेरी किल्ला साकारून प्रथम क्रमांक मिळवला. एस.जी. ज्युनियर मंडळ (द्वितीय) स्वस्तिक मित्र मंडळ (तृतीय क्रमांक)जय शिवराय ग्रुप,संगमपाडा मित्र मंडळ यांनी बक्षीस प्राप्त केले. उत्कृष्ट सादरीकरणात एस.जी.ग्रुप मंडळ,तरविघ्नेश्वर मित्र मंडळ, जय गावदेवी मित्र मंडळ,बाळ गणेश मित्र मंडळ यांनी उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले.विजेत्यां मंडळाना रोख रक्कम व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.उभारण्यात आलेल्या किल्ले स्पर्धेचे परिक्षण प्रा.प्रविण जयराम ठाकरे यानी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघर्ष समितीचे नाना झळके,अजय पाटील,अशोक पालांडे, बाळा शेलार,

व्यंकटेश चिटकेन,भाई वनगे,नागेश झंपाल,श्रीनिवास आडेगोपूला,राजू गाजेंगी,श्रीधर रुद्रा,हिमांशू वनगे,

व्यंकटेश गालपेली,कोंडा गाजेंगी अदि सदस्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रम प्रास्ताविक अजय पाटील,सुंत्रसंचलन शैलेश मांजरेकर व आभार प्रदर्शन नाना झळके यांनी केले.






# शहापूर आगाराला मिळाले दीडशेहून अधिक मार्गफलक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**कल्याण** - शहापूर एस. टी. बस आगारातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या बहुतांशी बसचे दर्शनी भागातील गावांचे शेवटचा थांबा (गन्तव्य स्थान) दर्शविणारे नामफलक खराब, पुसट आणि जुने झाले होते. त्यामुळे प्रवाशांना दर्शनी भागात बस कोठे जाणार आहे असा मार्गफलक दिसत असला तरी त्यावरील पुसट नावाने प्रवाशांचा गोंधळ होत होता.

हा गोंधळ शहापूर तालुक्यातील चांग्याचापाडा येथील सामाजिक कार्यकर्ते बबन हरणे यांनी दूर केला. आणि दिवाळीनिमित्त शहापूर एस. टी. बस आगारातून विविध गावांमध्ये, परिसरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसचे गन्तव्यस्थानाचे १५० हून अधिक मार्गफलक बनवून दिले.

या आगळ्या वेगळ्याचे उपक्रमाचे प्रवाशांबरोबर एस. टी. बस आगारातील अधिकारी, वाहक, चालक यांनीही समाधान व्यक्त केले. शहापूर बस आगार उभारून ५० वर्षांहून अधिकचा काळ लोटला आहे.

नवीन बस आगार उभारणीची कामे जोमाने सुरू आहेत. बस आगारातील बस गाड्या जून्या झालेल्या आहेत. या बसआगारा बरोबर या बसवर दर्शनी भागात झळकणारे यापूर्वीच तीन फूट लांबीचे काळ्या रंगाने रंगविलेले आणि त्यावर पांढऱ्या शुभ्र रंगाने ठळकपणे गावांची नावे लिहिलेले फलक गंजले आहेत. त्यावरील नावे पुसली गेली आहेत.

यापूर्वी बसच्या दर्शनी भागातील चालकाच्या समोरील वरील भागात बस कोठे जाणार आहे असा फलक झळकत असे. आता बसचा चेहरा बदलल्याने चालकाच्या डाव्या बाजुला कोपऱ्यात हे नामफलक अडकविलेले असतात.

शहापूर बस आगारात अशाप्रकारचे नाम फलक आहेत. त्यावरील रंग उन-पावसाने उडाला आहे. त्यामुळे बसच्या दर्शनी भागात चालकाच्या बाजुला नामफलक झळकत असला तरी फलकावरील गावाचे नाव दूरवरून ठळक दिसत नसल्याने प्रवाशांची अडचण होत होती.

# पावसाच्या सरी ऑक्टोबर अखेरपर्यंत कोसळणारच !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूरः** मे महिन्यात सुरू झालेला पाऊस ऑक्टोबर संपत आला तरी थांबताना दिसत नाही. ऐन दिवाळतही पाऊस कोसळला. मात्र हा पाऊस ऑक्टोबर अखेरपर्यंत कोसळण्याचा अंदाज हवामान अभ्यासकांनी वर्तवला आहे. यंदाच्या वर्षात पूर्वमोसमी पाऊस कोसळला, नंतर मोसमी पाऊस आणि त्यानंतर उत्तर मोसमी पाऊसही सुरूच आहे. त्यामुळे पावसाचा काळ जवळपास सहा महिने झाला आहे. यंदाचे निम्मे वर्ष पावसात गेले आहे. आणखी काही काळ याच पावसाचा सामना करावा लागणार आहे. दिवाळीनंतरही महाराष्ट्रात सुरू असलेल्या पावसामुळे अनेक नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित झाला आहे. मान्सून अजून गेला नाही का, पण हवामान तज्ज्ञांच्या मते, पाऊस फक्त दक्षिण-पश्चिम मान्सूनपुरता मर्यादित नसतो. दरवर्षी जून ते सप्टेंबर हा महाराष्ट्रासाठी मुख्य मान्सूनचा काळ असतो. मात्र, या काळाच्या बाहेरही विविध हवामान प्रणाल्यांमुळे अधूनमधून पाऊस होऊ शकतो, अशी माहिती खासगी हवामान अभ्यासक अभिजीत मोडक यांनी दिली आहे. ईशान्य मान्सून ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांत उत्तर मोसमी पाऊस आणतो, तर पश्चिम विक्षोभ जानेवारी ते मार्च या कालावधीत उत्तर भारतासह महाराष्ट्रातही कधीकधी हलका पाऊस देतो. त्याचप्रमाणे, एप्रिल-मे महिन्यांत पूर्व-मान्सून काळातील लहान मोठी वादळे आणि लाइन विंड डिस्कॉन्टिन्युइटी या प्रणालींमुळे देखील काही भागांत पाऊस पडतो. मात्र या कालखंडांतील पाऊस नियमित नसतो, तर हवामानातील विशिष्ट परिस्थितीनुसारच तो घडतो. असेही मोडक यांनी सांगितले आहे.

## मुरबाड पोलीसांची बस स्थानकात सायबर जनजागृती मोहिम!



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुरबाड - प्रतिनिधी**

मा. पोलिस अधीक्षक, ठाणे ग्रामीण मा. सो (SP) यांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड पोलिस ठाण्याच्या वतीने सायबर ऑनलाईन फसवणूक व पॉक्सो गुन्हे प्रतिबंधासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम मुरबाड बस स्थानक तसेच मुरबाड बाजारपेठ परिसरात आयोजित करण्यात आला असून, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी पटनाट्य (Street Play) द्वारे संदेश पोहोचविण्यात आला. या पटनाट्यातून नागरिकांना ऑनलाईन फसवणुकीचे विविध प्रकार, मोबाईल व सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, तसेच अल्पवयीन मुलांवरील अत्याचार प्रतिबंधक कायदा (POCSO Act) याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. या उपक्रमात पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक, विद्यार्थी, व्यापारी वर्ग यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

यावेळी मुरबाड पोलिस ठाण्याचे अधिकारी यांनी नागरिकांना आवाहन करत ऑनलाईन व्यवहार करताना जागरूक राहावे आणि कोणतीही संशयास्पद फसवणूक झाल्यास तत्काळ सायबर हेल्पलाईन 1930 किंवा cybercrime.gov.in या पोर्टलवर तक्रार नोंदवावी असे आवाहन मुरबाड पोलिसांच्या वतिने यावेळी करण्यात आले.

## बांधकाम साहित्य रस्त्यावर फेकल्याने कल्याण मुरबाड रोडवर भीषण अपघात

### निवृत्त पोलीस अधिका-याचे नाव समोर?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**बातमीदार**

**कल्याण :** गोवेली-मुरबाड रोडवरील मामणोली आणि कोलम गावांच्या हद्दीत महाजन फार्महाउस परिसरात शुक्रवारी संध्याकाळी झालेल्या भीषण अपघातात रमेश हरणे (वय 55, रा. मामणोली) या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. संध्याकाळी साडेसातच्या सुमारास कल्याणहून गावाकडे जात असताना दुचाकी स्लीप झाल्याने हा गंभीर अपघात घडला.

या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून रस्त्यावरच बांधकाम साहित्य टाकून वाहतुकीचा धोका निर्माण केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.यामध्ये निवृत्त पोलीस अधिका-याचे नाव समोर येत असून पोलीस त्यांना वाचविण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे ही ग्रामस्थांचे म्हणने आहे.

कल्याण मुरबाड रोडवरील केलणी कोलम ग्रामपंचायत हद्दीत महाजन फार्महाउसजवळ सध्या बांधकाम सुरू आहे. या बांधकामासाठी वापरले जाणारे सिमेंट, गिट्टी आणि इतर मटेरियल मुख्य रस्त्यालगतच ठेवण्यात आले आहे. त्यातच महामार्गाचे सुधारणा काम सुरू असल्याने अनेक ठिकाणी रस्ता अरुंद व एकेरी करण्यात आला आहे. याच दरम्यान रमेश हरणे दुचाकीवरून कल्याण हून मामणोली कडे जात असताना रस्त्यावर पसरलेल्या रेती-गिट्टीवरून स्कुटी घसरली आणि ते जोरात खाली फेकले गेले.

रस्त्याच्या कडेला असलेले गटाराचे लोंखडांचे डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना त्वरित गोवेली येथील रुग्णालयात नेण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. ज्या ठिकाणी अपघात झाला, त्या ठिकाणी गेल्या काही दिवसांपासून मटेरियल रस्त्यावरच टाकून ठेवले जात आहे. यामुळे वाहनचालकांना धोका निर्माण झाला होता. पण याकडे कोणीच लक्ष दिले नाही," असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच, महाजन फार्महाउस हे एका निवृत्त पोलिस अधिकाऱ्याचे असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. "निवृत्त अधिकारी असूनही सुरक्षिततेची जाणीव न ठेवता रस्त्यावरच बांधकामाचे अवशेष टाकून माणसाचा बळी गेला," असा रोष ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे.

शिवाय या अगोदर देखील हे पोलीस अधिकारी व ग्रामस्थ यांच्या विविध कारणावरून वाद झाल्याचे समजते. या घटनेनंतर पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे आणि पुढील तपास सुरू आहे.

अपघाताबाबत माहिती घेण्यासाठी फार्महाउसच्या मालक महाजन यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांनी फोन रिसिव्ह केला नाही. या प्रकरणात एका निवृत्त पोलिस अधिकाऱ्याचे नाव समोर येत असल्याने तपास कोणत्या दिशेने जातो, दोषींवर प्रत्यक्ष काय आणि किती कडक कारवाई होते याकडे परिसरातील नागरिकांसह सर्वांचे लक्ष लागले आहे



## 20 वर्षांनंतर पुन्हा भरली 'एक दिवसाची शाळा'

### सायगव्हाण माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचे अविस्मरणीय गेट-टुगेदर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** माध्यमिक विद्यालय, सायगव्हाण (ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील इयत्ता दहावी (सन २००५–०६) च्या माजी विद्यार्थ्यांचा "२० वर्षांनंतर पुन्हा एक दिवसाची शाळा" हा गेट-टुगेदर कार्यक्रम शुक्रवार दिनांक २४ ऑक्टोबर रोजी अतिशय उत्साही, आनंददायी आणि भावनिक वातावरणात पार पडला.

शाळेच्या आवारात पुन्हा एकत्र जमलेले सर्व मित्र-मैत्रिणी जणू बालपणात परतल्यासारखे भावूक झाले. वर्गातील बाकं, शिक्षकांचा परिचित आवाज, आणि शाळेच्या वातावरणाचा सुगंध हे सर्व पुन्हा जिवंत झाल्यासारखं वाटलं. "आज पुन्हा आपण विद्यार्थी झालो आहोत..." ही भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होती. या गेट-टुगेदरला मुख्याध्यापक जगदीश सुर्यवंशी, एस. के. पाटील, जे. के. पाटील, विनोद पाटील, योगेश पाटील, साबळे, अरुण राठोड, चेतन पाटील, वाघ, योगेश जगताप, सागर पाटील, प्रविण देवरे, पिरन पाटील, विनोद महाजन, राजेंद्र पाटील, आणि सर्व शिक्षकवर्ग व कर्मचारी उपस्थित होते.

सर्व शिक्षकांनी जुन्या दिवसांच्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांशी हृदयस्पर्शी संवाद साधला. त्यांनी जीवनमूल्ये, संस्कार आणि संवेदनशीलतेचे महत्त्व अधोरेखित करत, शाळेचे संस्कारच जीवनातील खरे भांडवल असल्याचा संदेश दिला. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा विद्यार्थी झाल्याचा आनंद अनुभवता आला.

मित्र-मैत्रिणींच्या ओळख-परिचय सत्रात विविध क्षेत्रात झळकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपला जीवनप्रवास आणि यशोगाथा उत्स्फूर्तपणे मांडली. सर्वांनी एकच भावना व्यक्त केली, "शाळेचे संस्कार हेच आपल्या प्रगतीचे आधारस्तंभ आहेत."

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन, समन्वय आणि आदरातिथ्य याबद्दल सर्व आयोजक मित्रांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या निष्ठा, मेहनत आणि एकजुटीमुळे हा दिवस प्रत्येकासाठी अविस्मरणीय ठरला. गप्पा, हशा आणि भावनिक क्षणांनी वातावरण भारावून गेलं. हसतमुख क्षण आणि भावनिक ओलावा यांनी हा दिवस प्रत्येकाच्या मनात कायमचा कोरला गेला. या कार्यक्रमासंबंधीची सविस्तर माहिती माजी विद्यार्थी कल्याणचे रहिवासी अनुज्ञापन निरीक्षक विजय जाधव यांनी दिली.

## जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत हॉली क्रॉस शाळेच्या मुलींची चमकदार कामगिरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** नुकत्याच पार पडलेल्या आंतरशालेय जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत कल्याणच्या हॉली क्रॉस शाळेच्या मुलींनी चमकदार कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. दोन्ही गटात नेत्रदीपक यश मिळवत त्यांनी शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. हॉली क्रॉस शाळेच्या मुलींनी १७ वर्षांखालील गटात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या गटात तब्बल ३६ संघांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या लढतीत हॉली क्रॉसच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवत शाळेसाठी १७ वर्षांनंतर सुवर्णक्षण प्राप्त केला आहे.

या दमदार विजयामुळे या विजयी संघाला आता मुंबई विभागीय स्पर्धेसाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळाला आहे. याचबरोबर १४ वर्षांखालील गटातही हॉली क्रॉस शाळेच्या मुलींनी आपले वर्चस्व सिद्ध केले. या गटात १९ संघांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी हॉली क्रॉसच्या संघाने उत्कृष्ट खेळ सादर करत द्वितीय क्रमांक (उपविजेतेपद) पटकावले.

मुलींच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका जेसिंथा यांनी संघाचे विशेष अभिनंदन केले आहे. तसेच, त्यांनी खेळाडूंच्या भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

क्रीडा शिक्षक रविंद्र देसाई आणि खो-खो प्रशिक्षक भारत नाईकनवरे यांच्या प्रयत्नांमुळे आणि योग्य मार्गदर्शनाखालीच मुलींनी हे यश संपादन केल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या यशाबद्दल सर्व स्तरांतून खेळाडूंचे आणि मार्गदर्शकांचे कौतुक होत आहे.

## भिवंडी काँग्रेसची मोर्चेबांधणी सुरु

### जिल्हापरिषद निवडणूकीसाठी ३५ इच्छुकांच्या मुलाखती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी ( प्रतिनिधी )** ठाणे जिल्ह्यात आगामी होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाचे ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी जोरदार मोर्चा बांधणी सुरू केली असून जिल्हा परिषदेच्या गटात निवडणूक लढविणाऱ्या 35 इच्छुक उमेदवारांच्या आज मुलाखती घेऊन त्यांचे विचार जाणून घेतले.यावेळी त्यांच्यासोबत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे भिवंडी प्रभारी राजेश जाधव,तालुकाध्यक्ष निलेश भोईर व पक्षातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.ठाणे ग्रामीण भागात होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुका जिंकण्याच्या भूमिकेतून जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत मोर्चा बांधणी सुरू केली आहे.महाविकास आघाडी झाल्यास कोणत्या जागा लढविल्या जातील याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व इच्छुक उमेदवारांनी उस्फूर्तपणे जनसंपर्क कार्यालयात गर्दी केली होती



भिवंडी तालुक्यातील पंचायत समितीच्या 42 गण (जागा) व जिल्हापरिषदेच्या 21 गट (जागा) लढविण्यासाठी प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या आदेशानुसार काँग्रेस पक्षाचे जनसंपर्क कार्यालयात आज सकाळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी जिल्हापरिषद गटात निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांचे मुलाखत कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी त्यांनी सांगितले की ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद गट व गणात महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविण्याची तयारी सुरू आहे.मात्र याबाबत अद्याप कोणत्याही प्रकारचा निर्णय वरिष्ठस्तरावर झालेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष यांच्या आदेशानुसार जिल्हा परिषद गटात स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी काँग्रेस पक्षाचेवतीने सुरू झाली झाली आहे.गण व गटात निवडणूक लढविण्यास तयार असलेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती आज दुपारी घेण्यात आल्या आहेत.सन्मानपुर्वक महाविकास आघाडी झाली तर भिवंडी तालुक्यातील 7 ते 8 गटात जिल्हा परिषदेच्या व 10 ते 11पंचायत समिती गणात निवडणूक लढविण्याची तयारी आहे.मात्र आघाडी न झाल्यास 15 ते 16 गटात तर 28 ते 30 गणात उमेदवार उभे करून जिंकून आणण्यासाठी प्रयत्न राहतील अशी माहिती जिल्हाध्यक्ष चोरघे व प्रदेश प्रभारी राजेश जाधव यांनी दिली. भाजप महायुतीला रोखण्यासाठी आगामी निवडणुकीत महाविकास आघाडी व्हावी असे प्रयत्न सुरू आहेत न झाल्यास काँग्रेस पक्ष स्वबळावर निवडणूक लढवेल अशी माहिती त्यांनी दिली.लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेस आघाडी पक्षाचे सर्वात जास्त खासदार निवडून आले आहेत त्यामुळे काँग्रेस पक्ष नंबर एक वर

आहे. त्यामुळे पक्ष कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण झाला असून महायुतीचा व्होट चोरी व मतदार यादी मध्ये केलेला गोंधळ उघडकीस आला आहे.त्यामुळे मतदार जनता आता अर्थिक प्रभोधणाला न भुलता काँग्रेस आघाडी पक्षा सोबत राहील.येणाऱ्या निवडणुकीत भाजप शिवसेना महायुतीला धडा शिकवण्यासाठी काँग्रेस पक्ष सज्ज असल्याची माहिती चोरघे यांनी दिली.



## पाथर्ली स्मशानभूमीचे काम रखडले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** डोंबिवली पूर्वेतील पाथर्ली गावातील स्मशानभूमीचे काम गेल्या दोन ते अडीच वर्षांपासून संथ गतीने सुरू आहे. डोंबिवली पूर्वेकडील या भागात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. एखादे मयत झाल्यास नागरिकांना दत्तनगर शिव मंदिर स्मशानभूमीत अंत्यविधी साठी जावं लागतं, त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. या स्मशानभूमीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी सर्व पक्षीय हक्क सरंक्षण संघर्ष समितीच्या वतीने सत्यवान म्हात्रे यांनी केली आहे.



## मिरा-भाईंदरमधील नैसर्गिक तलाव छटपूजेसाठी बंद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**बातमीदार**

**भाईंदर, ता. २६** मिरा-भाईंदरमधील नैसर्गिक तलाव छटपूजेसाठी बंद ठेवण्यात आले आहे. सोमवारी (ता. २७) होत असलेली छटपूजा कृत्रिम तलावातच करण्याची भक्तांसाठी परवानगी मिरा-भाईंदर महापालिकेकडून देण्यात आली आहे. जेसल पार्क खाडीसह सात ठिकाणी महापालिकेने कृत्रिम तलावाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

पर्यावरण रक्षणासाठी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार यावर्षी सहा फुटांपर्यंतच्या सर्व गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन पार पडले. काही ठिकाणी भक्तांकडून कृत्रिम तलावात विसर्जन करण्यास नकार देण्यात आला होता; मात्र प्रशासन आपल्या निर्णयावर ठाम राहिली होती. नवरात्रोत्सवातही देवींच्या मूर्तीचे कृत्रिम तलावात विसर्जन पार पडले. आता पाठोपाठ आलेल्या छटपूजेसाठीदेखील नैसर्गिक तलावांचे दरवाजे न उघडण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. छटपूजेसाठी भक्त तलावात छट उभारून त्याची पूजा करतात, तसेच सकाळच्या वेळी पाण्यात उतरून सूर्याला नमस्कार करतात.

दरवर्षी मिरा-भाईंदर शहरातील खाड्या व नैसर्गिक तलावात हा उत्सव पार पडत असतो; मात्र यावर्षी छटपूजेसाठीदेखील नैसर्गिक तलाव उपलब्ध करून देऊ नये, अशी मागणी महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली होती. त्यानंतर महापालिकेने नुकताच यासंदर्भात निर्णय जाहीर केला आहे. या कृत्रिम तलावातच छुटपूजेचा उत्सव पार पडणार आहे. या उत्सवासाठी महापालिकेकडून कपडे बदलण्यासाठी कक्ष, तात्पुरती स्वच्छतागृहे, वैद्यकीय पथक व अग्निशमन दल आदी सुविधा तैनात करण्यात आली आहेत, अशी माहिती महापालिकेचे शहर अभियंता दीपक खांबित यांनी दिली.

## विश्व हिंदू परिषदेतर्फे आदिवासी बांधवांना फराळ वाटप

### 130 वाड्यांमध्ये 7400पॅकेट वाटप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी)** दरवर्षी प्रमाणे यंदाही विश्व हिंदू परिषदेतर्फे पेण, रोहा आणि खालापूर या तालुक्यातील कातकरी आणि ठाकूर समाजाच्या एकूण १३० गावांमध्ये ७हजार ४०० पॅकेट्स फराळाचे वाटप केले, शिवाय इतर समाजाच्या सहा वेगवेगळ्या वस्त्यांमध्ये फराळाचे वाटप रण्यात आले.या फराळ वाटप कार्यक्रम प्रसंगी प्रभुदास घरत चक्रदेव ,कृष्णा वाघमारे, हिरामण म्हात्रे, निलेश सुतार, राजू पाटील, जयंतीलाल मालवीय, विष्णू पवार, समीर नागोठकर, उदय पाटील, जनार्दन नाईक, मयूर नाईक आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

आपल्या कातकरी आणि ठाकूर बंधूंना दिवाळी आनंदाची जावी त्यांच्या घरामध्ये तयार न होणारे फराळाचे पदार्थ त्यांना खायला मिळावेत म्हणून दिवाळी सण मोठा नाही आनंदाचा तोटा या उक्तीप्रमाणे खरवली,निगडे,कारली, कामार्ली , सावरसई मोहाडी यासह अनेक आदिवासी वाड्यांमध्ये विश्व हिंदू परिषदेतर्फे केलेला हा एक कार्यक्रम. यामध्ये विश्व हिंदू परिषदेच्या ४२ कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला आणि कार्यक्रम सहा दिवस राबवून यशस्वी करण्यात आला.

## दुर्ग मावळा प्रतिष्ठानच्या गडकिल्ले प्रतिकृती स्पर्धेत आई एकविरा ग्रुप प्रथम






**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** दिवाळीच्या आनंदोत्सवात मुलांच्या मनावर शिवसंस्कार रूजावेत, गड-किल्ल्यांचा अभिमान त्यांच्या अंत:करणात रुजावा व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा इतिहास त्यांच्या हृदयात कोरला जावा, या उद्देशाने दुर्ग मावळा प्रतिष्ठान तर्फे उरण तालुकास्तरीय दिवाळी गड-किल्ले स्पर्धा २०२५ उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडली. गड-किल्ले म्हणजे केवळ दगडांचे बांधकाम नव्हे, तर ते स्वातंत्र्याची शपथ, मराठ्यांच्या शौर्याची तलवार आणि महाराजांच्या अजेय तेजाचे प्रतीक आहेत. सिंहगड, प्रतापगड, तोरणा, रायगड, राजगड, सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग या किल्ल्यांमध्ये इतिहासाने क्रांती घडवली आहे. तो इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. ही स्पर्धा म्हणजे किल्ल्यांची प्रतिकृती तयार करणे नाही... तर किल्ल्यांशी नाते जोडणे आहे!या माध्यमातून स्पर्धकांना शिस्त, एकता, टीमवर्क,नेतृत्व, अडचणींवर मात करण्याची धडाडी हे गुण आत्मसात करता येतात. ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन हे गड-किल्ले उभे केले, त्या मावळ्यांना मानाचा मुजरा या स्पर्धेमधून देण्यात आला. या स्पर्धेत उरण तालुक्यातील अनेक मावळ्यांनी सहभाग घेतला. परीक्षकांनी स्वतः प्रत्येक गावात जाऊन. किल्ल्यांची सादरीकरण पद्धत, माहिती, बांधकाम कौशल्य यावर आधारित विजेते घोषित केले. त्यानंतर प्रत्येक स्पर्धकाच्या घरी जाऊन त्यांना सन्मानित केले.

यास्पर्धेचे प्रथम क्रमांक : आई एकविरा ग्रुप वेश्वी – पद्मदुर्ग किल्ला (रोख बक्षीस रु.२०००) द्वितीय क्रमांक जय हरी ग्रुप, बोरी – सिंधुदुर्ग किल्ला (रोख बक्षीस रु.१५००) तृतीय क्रमांक साई अशोक पाटील, वेश्वी – सिंहगड किल्ला (रोख बक्षीस रु.१०००). सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, भावी पिढी स्वराज्याचा कणखर कणा बनण्यासाठी गड-किल्ल्यांचे प्रेरणास्थान ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या स्पर्धेचे यशस्वी आयोजन दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण-विभागाचे अध्यक्ष राज मात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या उपक्रमात मनीष पाटील, चेतन गावंड, गणेश कोळी, शेखर भोमकर, रणिता ठाकूर, आकाश पाटील, समाधान पाटील इत्यादी शिलेदारांनी मोलाचे योगदान देत कार्यक्रम अत्यंत प्रभावीरीत्या पार पाडला.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024